!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४७० ०१-३-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# संभाजीनगर-दिल्ली रेल्वे सुरु करा

## खासदार चंद्रकांत खैरे यांची लोकसभेत मागणी

**दिल्ली ( ता.०६ ) :** राज्याची पयर्टन राजधानी म्हणुन संभाजीनगरची ओळख आहे. मात्र अमृतसर-नांदेड ही एकच गाडी या मार्गावर असुन थेट संभाजीनगर दिल्ली रेल्वे सुरु करावी अशी मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकात खैरे यांनी केली. रेल्वेमंत्र्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्प रेल्वेला नवी दिशा देणारा असल्याचेही खासदार चंद्रकांत खैरे यावेळी म्हणाले.

रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांनी मांडलेल्या रेल्वे अर्थसंकल्पावरील चर्चेत शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी आपले मत मांडले. यावेळी बोलतांना खासदार चंद्रकांत खैरे म्हणाले, रेल्वे भाड्यात वाढ न करता प्रवाशांच्या सुविधांवर भर देणारा आणि रेल्वेला विकासाच्या वाटेवर घेऊन जाणारा हा अर्थसंकल्प आहे. मराठवाड्यच्या मागण्यांकडे रेल्वे मंत्रालयाकडून कोनाडोळा केला जात आहे. संभाजीनगर राज्याची पर्यटन राजधानी आहे. देशविदेशातुन येथे पर्यटक येतात. पण अद्यापही संभाजीनगरला दिल्लीकडून थेट रेल्वे नाही. त्यामुळे अर्थसंकल्पात घोषणा केलेल्या चार गाड्यांपैकी एक गाडी दिल्ली संभाजीनगरसाठी सुरु करावी. अशी मागणी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली. तसेच संभाजीनगर रेल्वे स्थानकाच्या विकासासाठी निधी, संभाजीनगर-चाळीसगाव आणि सोलापुर-जळगाव रेल्वे मार्गाचा मुद्दा उपस्थित केला. पुर्वनियोजित पध्दतीने त्यांचे काम करण्याचे आवाहन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525